नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २२० Issue - 220 | वार शुक्रवार दि. २७ डिसेंबर २०२४ Blow- Friday Date 27 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन

## देशात सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा, आजचे शासकीय कार्यक्रम रद्द; मनमोहन सिंग यांच्यावर आज होणार अंत्यसंस्कार!

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताचे माजी पंतप्रधान, अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचं वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झालं. वृद्धापकाळाने त्यांची दिल्लीतील एम्स रुग्णालयात प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने अवघ्या देशावर शोककळा पसरली आहे. त्यामुळे आज (२७ डिसेंबर) आयोजित केलेले सर्व शासकीय कार्यक्रम रद्द करण्यात आले आ-हेत. शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार असल्याची माहिती पीटीआयने दिली आहे.

मनमोहन सिंग यांना गुरुवारी रात्री ८ वाजता आपत्कालीन परिस्थिती दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरू असताना रात्री ९.५१ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालव-ली. यानंतर लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी मनमोहन सिंग यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या आहेत. माझे आदर्श हरपल्याची भावना राहुल गांधींनी व्यक्त केली आहे.

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, २७ डिसेंबर रोजी आयोजित केलेले सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. देशात सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात येणार आहे. आज ११ वाजता यासंदर्भात मंत्रिमंडळ बैठक आयोजित करण्यात आली आहे. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

राहुल गांधींनी वाहिली श्रद्धांजली

मनमोहन सिंग यांनी एकात्मतेच्या, राष्ट्रीयत्वाच्या भावनेने देशाचा कारभार चालवला. त्यांची अर्थशास्त्रातली जाण खूप उत्तम होती. त्याचा आदर्श देश कायम घेत राहिल.श्रीमती कौर आणि त्यांचं संपूर्ण कुटुंब यांच्या प्रति मी सहवेदना व्यक्त करतो. मी आज माझे आदर्श आणि माझे मार्गदर्शक गमावले आ-हेत. काँग्रेस पक्षातले माझ्यासारखे लाखो लोक मनमोहन सिंग यांची आठवण अभिमानाने काढतील, त्यांना कायम स्मरणात ठेवतील. या आशयाची पोस्ट राहुल गांधींनी केली



आहे.

मनमोहन सिंग यांची राजकीय कारकीर्द प्रदीर्घ होती

मनमोहन सिंग ३३ वर्षे खासदार होते. विद्वान, मृदू, मितभाषी आणि संवेदनशील नेता म्हणून मनमोहन सिंग यांच्याकडे पाहिले जायचे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर ते पहिलेच असे पंतप्रधान होते, जे १० वर्षे देशा-चा राज्यकारभार सांभाळू शकले. २००४ ते २०१४ असे दहा वर्ष ते देशाचे पंतप्रधान होते. तसेच १९९८ ते २००४ या काळात ते राज्यसभेचे विरोधी पक्षनेतेही होते. ३३ वर्षांपूर्वी म्हणजे १९९१ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी राज्यसभेच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. चार महिन्यातच त्यांनी माजी पंतप्रधान पीव्ही नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री म्हणून शपथ घेतली होती. तसंच युपीएच्या काळात म्हणजेच २००४ ते २०१४ या कालावधीत ते सलग दोन टर्म म्हणजेच १० वर्षे देशाचे पंतप्रधान होते. मनमोहन सिंग यांच्या जाण्याने भारतीय राजकारणाने एक सालस नेता गमावला आहे.

## पंतप्रधान म्हणून त्यांनी जनतेचे जीवन सुखकर करण्यासाठी अथक प्रयत्न केले : पंतप्रधान नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे दिल्लीतील एम्स रुग्णालयात आज (दि. २६ डिसेंबर) निधन झाले. प्रकृती खालावल्यामुळे त्यांना सायंकाळी एम्समध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर संपूर्ण देशभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी संबंधित जुन्या आठवणींना उजाळा दिला.



डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी शोक व्यक्त केला. त्यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले, देशातील प्रतिष्ठित नेत्यांपैकी एक असलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल आज भारत शोक व्यक्त करत आहे. सामान्य पार्श्वभूमी अस-लेले डॉ. मनमोहन सिंग एक विख्यात अर्थतज्ज्ञ बनले. त्यांनी अर्थमंत्री आणि इतरही अनेक पदांवर काम करत अनेक वर्ष आपल्या आर्थिक धोरणांवर छाप सोडली. संसदेत त्यांनी मांडलेले मुद्देही व्यावहारिक असत. पंतप्रधान म्हणून काम करत असताना त्यांनी जन-तेचे जीवन सुखकर करण्यासाठी अथक प्रयत्न केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढे लिहिले, डॉ. मनमोहन सिंग देशाचे पंतप्रधान आणि मी गुजरातचा मुख्यमंत्री असताना आमच्यात नेहमी सुसंवाद होत असे. शासनाशी संबंधित अनेक विषयांवर आम्ही चर्चा करत असू. यावेळी त्यांची बुद्धिमत्ता आणि विनम्रता पाहायला मि ळायची. या दुःखद प्रसंगी डॉ. मनमोहन सिंग यांचे कुटुंबिय, मित्र आणि हितचिंतकांच्या प्रती मी सहसंवेदना व्यक्त करतो. ओम शांती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खा-सदार प्रियांका गांधी वाड्रा, मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह देशभरातील सर्वच नेत्यांनी एक्सद्वारे श्रद्धांजली वाहिली आहे.

## जागतिक धुरंधर नेता गमावला, शरद पवारांनी डॉ. मनमोहन सिंग यांना वाहिली श्रद्धांजली

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं आज (२६ डिसेंबर) रोजी रात्री ९ वाजून ५१ मिनिटांनी त्यांचं निधन झालं. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी दिल्लीतील एम्स रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दुःख व्यक्त केलं आहे. त्यांनी एक्सद्वारे मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहिली.



भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनाची बातमी ऐकून अतीव दुःख झाले. आपल्या देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, द्रष्टा सुधारणावादी आणि जागतिक धुरंधर नेता गमावला आहे. त्यांच्या रूपाने एक ईश्वरीय आत्मा स्वर्गाच्या प्रवासाला निघून गेला ही अतिशय वेदनादायक बातमी आहे. डॉ. मनमोहन सिंह विनयशीलता, सहनशीलता, सहिष्णुता आणि करुणेचे प्रतीक होते. भारताची आर्थिक सुध-ारणा घडवून आणणारे हे महान व्यक्तिमत्त्व येणाऱ्या पिढ्यांसाठी अक्षय्य प्रेरणास्रोत राहिल. ईश्वर डॉ. मनमोहन सिंह यांच्या आत्म्यास चीरशांती देवो, असं म्हणत शरद पवारांनी श्रद्धांजली वाहिली.

मनमोहन सिंग ३३ वर्षे खासदार होते. विद्वान, मृदू, मितभाषी आणि संवेदनशील नेता म्हणून मनमोहन सिंग यांच्याकडे पाहिले जायचे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर ते पहिलेच असे पंतप्रधान होते, जे १० वर्षे देशाचा राज्यकारभार सांभाळू शकले. २००४ ते २०१४ असे दहा वर्ष ते देशाचे पंतप्रधान होते. तसेच १९९८ ते २००४ या काळात ते राज्यसभेचे विरोधी पक्षनेतेही होते.

३३ वर्षांपूर्वी म्हणजे १९९१ साली डॉ. मनमोहन सिंग यांनी राज्यसभेच्या म ाध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. चार महिन्यातच त्यांनी माजी पंतप्रधान पीव्ही नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री म्हणून शपथ घेतली.

## माझ्याजवळचा असला तरी सोडू नका, संतोष देशमुख हत्येप्रकरणी धनंजय मुंडेंकडून फाशीची मागणी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



बीड जिल्ह्यातील मस्साज-ोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. यामध्ये धनजंय मुंडे यांच्या जवळचे असेलेले वाल्मिक कराड यांचेही नाव समोर येत आहे. कारड यांचे नाव घेत अनेक आमदारांनी त्यांच्यावर टीका केली आहे. अशात विरोधक धनंजय मुंडेंनाही यावरून लक्ष्य करत आहेत. आज कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांनी या प्रकरणातील आरोपींना फाशी द्यावी असे म्हटले आहे. याचबरोबर या प्रकरणात माझ्या जवळचा कोणी असेल तर त्यालाही सोडून नका असे ते म्हटले आहेत.

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांची भेट झाली. या भेटीनंतर धनंजय मुंडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी मुंडे म्हणाले की, जिथे माझी बैठक होती, तिथेच मुख्यमंत्र्यांचीही बैठक होती. त्यावेळी योगायोगने आमची भेट झाली. ज्या देशमुखांची हत्या झाली आणि ज्यांनी कोणी हे केले ते फासावर जायला पाहिजेत या मताचा मी आहे. ते शेवटी माझ्या जिल्ह्यातील एक सरपंच होते. मलाही त्यांच्याबाबतीत तेवढाच आदर आहे. जे कोणी गुन्हेगार आहेत, त्या सर्वांना फाशीची शिक्षा करा. मग तो कोणाच्याही जवळचा असो. अगदी माझ्या जवळाचा असेल तर त्यालाही सोडायचे नाही म्हणत असताना, म ाझ्यावर आरोप करण्यामागे काय राजकारण असेल हे आपण समजू शकता. बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर संपूर्ण राज्य हादरले आहे. या घटनेचे पडसाद विधानसभा आणि लोकसभेमध्येही उमटल्याचे पाहायला मि ळाले. महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानसभेत आणि खासदारांनी लोकसभेत हा विषय मांडून संतोष देशमुख यांना न्याय देण्याची मागणी केली आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान भाजपा आमदार सुरेश धस, राष्ट्रवादीचे (शरद पवार) जितेंद्र आव्हाड आणि संदीप क्षीरसागर यांनी याबाबत आवाज उठवल्याचे पाहायला मिळाले होते. बीड जिल्ह्यातील मस्स-ाजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्यानंतर त्यांचे कुटुंबिय, निकटवर्तीय व मित्र परिवाराने त्यांचा सर्वत्र शोध घेतला.

### कृती आराखड्यासाठी मुख्यमंत्री आग्रही


### फडणवीस यांच्या सूचना

## प्रत्येक खात्याला १०० दिवसांचे ठोस नियोजन करण्याचे निर्देश

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रत्येक खात्याने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करून ठोस कामगिरी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिले. या आराखड्यात लोककेंद्रित व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनतेला लाभ मिळणाऱ्या योजना आदीं-चा समावेश असावा आणि राज्याचे नाव देशात अग्रेसर असावे, हा दृष्टिकोन अस-ावा, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर फडणवीस यांनी प्रत्येक खात्याला १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण, वन आणि कृषी विभागाने तयार केलेल्या आराखड्याबाबत सह्याद्री अतिथीगृहावर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



वन खात्याच्या बैठकीत फडणवीस म्हणाले, वन्य प्राणी व मानव यांमधील संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता व माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगातून उपाययोजना कराव्यात. मानव व वन्य प्राणी संघर्षाम ध्ये तातडीने मदत मिळण्यासाठी 'शीघ्र प्रतिसाद दला'ची स्थापना करण्यात यावी. या दलातील मनुष्यबळाला उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात यावे. वृक्षलागवडीचा संस्कार रुजण्यासाठी अभिनव उपक्रम कायमस्वरूपी अमलात आणावे, आदी मुद्द्यांचा समावेश वन विभागाने आपल्या आराखड्यात करावा.

राज्यात उच्च शिक्षण संस्था, विदेशी विद्यापीठांच्या शाखा किंवा त्यांच्याशी सामंजस्य करार करून उच्च शिक्षणाच्या संधी वाढविण्यासाठी बराच वाव आहे. त्या दृष्टीने कोणते प्रयत्न करता येतील, याविषयी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून कृती कार्यक्रम तयार करण्यात येणार आहे. या बैठकांम ध्ये संबंधित विभागाच्या सचिवांनी आराखड्यांचे सादरीकरण केले.

कृषी विभागाने आपल्या आराखड्यातून शेतकरी केंद्रबिंदू ठेवून योजनांची अंमलबजावणी करावी. बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता त्यांना अन्य राज्यातील अभयारण्यांम ध्ये गरजेनुसार पाठविण्याची व्यवस्था करावी. बिबटे निवारा केंद्रांची क्षमता वाढविण्यात यावी. वन विभागाने कार्बन क्रेडिट कंपनी स्थापन करण्याबाबत धोरण तयार करावे. वनीकरण वाढविण्यासाठी मियावाकी वृक्षलागवड पद्धत शहरांमध्ये उपयोगात आणावी. ॰ देशात येणाऱ्या परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात आकर्षित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शैक्षणिक संकुलांच्या उभारणीसाठी विशेष आराखडा तयार करावा.

## काँग्रेसमध्ये संघटनात्मक बदल; खरगेंचे संकेत

## बाबासाहेब आंबेडकरांच्या सन्मानासाठी पक्ष कटिबद्ध




**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बेळगाव : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत राज्यसभेत जे वक्तव्य केले त्याची चूक मान्य करण्यास सरकार किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी तयार नाहीत, अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली. घटनेच्या शिल्पकारांच्या सन्मानासाठी काँग्रेस पक्ष संघर्ष करेल, अशी ग्वाही खरगे यांनी दिली. तसेच पक्ष संघटनेत नव्यांना संधी देऊन, स्थानिक नेतृत्व बळकट केले जाईल असे त्यांनी जाहीर केले.

काँग्रेस कार्यकारिणीच्या येथील बैठकीच्या उद्घाटनावेळी खरगे यांनी भाजपवर चौफेर टीका केली. महात्मा गांधी यांनी बेळगाव येथे काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारण्याच्या घटनेला शंभर वर्षे झाली. त्यानिमित्त पक्षाने येथे 'नव सत्याग्रह बैठकी'चे आयोजन केले आहे. या बैठकीत पुढील वर्षाच्या पक्ष कार्यक्रमाची कृती योजना आखली जाईल. निवडणूक आयोगासह सर्व घटनात्मक संस्थांवर नियंत्रण असून, जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास उडत असल्याची बाब चिंत-ाजनक असल्याचा दावा खरगेंनी केला. त्याबाबत काही दिवसांपूर्वी त्यांनी निवडणूक नियमांत बदल केल्याचा संदर्भ खरगे यांनी दिला. याखेरीज मतदार याद्यांमधून नावे वगळणे, शेवटच्या टप्प्यात मतटक्का वाढणे किंवा काहींना मतदापासून रोखणे असे काही प्रश्न आहेत. मात्र त्याला सम ाधानकारक उत्तर मिळत नसल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली.राज्यसभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आंबेडकर यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले. आम्ही त्यावर आक्षेप घेतले. देशभर आता निदर्शने सुरू आहेत. मात्र पंतप्रधान चूक मान्य करण्यास तयार नाहीत. शहा यांनी माफी मागणे दूरच, उलट ते त्यांचे समर्थन करत आहेत, अशा शब्दात खरगेंनी पंतप्रधानांना लक्ष्य केले.

'गांधीजींचा विचार संपवण्याचा प्रयत्न'

महात्मा गांधी हे काँग्रेसचे प्रेरणास्रोत आ-हेत. मात्र दिल्लीत जे सत्तेत आहेत त्यांच्याकडून हे विचार संपवण्याचा प्रयत्न होतोय. मोदी सरकार तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप काँग्रेस संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी यांनी केला. सोनिया गांधी अधिवेशनास उपस्थित नसल्याने त्यांचा संदेश वाचून दाखविण्यात आला. ज्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला नाही ते आज गांधीजींच्या मारेकऱ्यांचे उदात्तीकरण करत आहेत, अशी टीका सोनियांनी केली.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### देशावर शोककळा

भारताचे माजी पंतप्रधान, अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचं वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झालं. त्यांच्या जाण्याने अवघ्या देशावर शोककळा पसरली आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी शोक व्यक्त केला. त्यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले, देशातील प्रतिष्ठित नेत्यांपैकी एक असलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल आज भारत शोक व्यक्त करत आहे. सामान्य पार्श्वभूमी असलेले डॉ. मनमोहन सिंग एक विख्यात अर्थतज्ज्ञ बनले. त्यांनी अर्थमंत्री आणि इतरही अनेक पदांवर काम करत अनेक वर्ष आपल्या आर्थिक धोरणांवर छाप सोडली. संसदेत त्यांनी मांडलेले मुद्देही व्यावहारिक असत. पंतप्रधान म्हणून काम करत असताना त्यांनी जनतेचे जीवन सुखकर करण्यासाठी अथक प्रयत्न केले. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनाची बातमी ऐकून अतीव दु:ख झाले. आपल्या देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, द्रष्टा सुधारणावादी आणि जागतिक धुरंधर नेता गमावला आहे. त्यांच्या रूपाने एक ईश्वरीय आत्मा स्वर्गाच्या प्रवासाला निघून गेला ही अतिशय वेदनादायक बातमी आहे. डॉ. मनमोहन सिंह विनयशीलता, सहनशीलता, सहिष्णुता आणि करुणेचे प्रतीक होते. भारताची आर्थिक सुधारणा घडवून आणणारे हे महान व्यक्तिमत्त्व येणाऱ्या पिढ्यांसाठी अक्षय्य प्रेरणास्त्रोत राहिल. मनमोहन सिंग ३३ वर्षे खासदार होते. विद्वान, मृदू, मितभाषी आणि संवेदनशील नेता म्हणून मनमोहन सिंग यांच्याकडे पाहिले जायचे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर ते पहिलेच असे पंतप्रधान होते, जे १० वर्षे देशाचा राज्यकारभार सांभाळू शकले. २००४ ते २०१४ असे दहा वर्ष ते देशाचे पंतप्रधान होते. मनमोहन सिंग यांच्या जाण्याने भारतीय राजकारणाने एक सालस नेता गमावला आहे.

## ग्रामसेवकास जातीवाचक बोलण्यावरून अंबाडी ग्राम पंचायत सदस्या विरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भिवंडी तालुक्यातील अंबाडी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना ग्रामपंचायतीतील एका सदस्याने जातीवाचक बोलण्यावरून ग्रामसेवकाच्या फिर्यादीवरून सदस्याच्या विरोधात गणेशपुरी पोलिस ठाण्यात अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम कलम न्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.संतोष पाटील असे गुन्हा दाखल झालेल्या सदस्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप जाधव हे जातीने नवबौद्ध असून ते अंबाडी ग्रामपंचायतीत ग्रामसेवक म्हणून काम पाहत आहेत.दरम्यान त्यांच्या कामकाजाच्या विरोधात अंबाडी सरपंच व सदस्य यांनी भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे बदली करणेबाबत तक्रारी अर्ज केलेला होता.त्यानंतर या अर्जाच्या अनुषंगाने २४ डिसेंबर रोजी साडे बारा वाजता अंबाडी सरपंच,सदस्य आणि पंचायत समितीचे विस्तार अधिकारी सुधाकर सोनावणे यांच्या उपस्थितीत ग्रामसेवक दिलीप जाधव यांच्या कामकाजाची चौकशी सुरू असतानाच संतोष पाटील यांनी,तुम्ही यापूर्वी केलेल्या तक्रारी अर्जाची थातुरमातुर चौकशी केली.ती आम्हाला मान्य नाही, त्या अर्जाची परत चौकशी व्हावी.असे विस्तार अधिकारी सुधाकर सोनावणे यांना सांगितले.त्यावेळी सुधाकर सोनावणे यांनी मागील अर्जाची चौकशी पूर्ण झाली असुन तुम्हाला मान्य नसल्यास वरिष्ठांकडे तक्रार करावी, असे सांगितले त्यावरुन संतोष पाटील यांनी तुम्ही थातुरमातुर चौकशी करून ग्रामसेवक दिलीप जाधव यांना पाठीशी घालत असाल तर अश्या निच जातीच्या, थर्ड क्लास ग्रामसेवकाला आम्ही आमच्या ग्रामपंचायत मध्ये ठेवणार नाही व येवु देणार नाही.असे अर्वाच्य भाषेत जातीवाचक बोलताच त्याचा जाब ग्रामसेवक जाधव यांनी सदस्य संतोष पाटील यांना विचारला असता संतोष पाटीलने चिडुन रागाने टेबलावर ठेवलेली पाण्याची बाटली उचलुन जाधव यांच्या डोक्यात मारण्याचा प्रयत्न केला.याप्रसंगी विस्तार अधिकाऱ्यानी मध्यस्थी करून पाटील यांना थांबविले.याप्रकरणी दिलीप जाधव यांच्या फिर्यादीवरून गणेशपुरी पोलिस ठाण्यात सदस्य संतोष पाटील यांच्या विरोधात भान्यासंतेच्या अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम सह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.त्यात दिवशी रात्रीच्या सुमारास सदस्य संतोष पाटील याना अटक करण्यात आली आहे.

## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची पुण्यतिथी भक्तीभावात व उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री समर्थ सद्गुरु ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकरांचा १११ पुण्यतिथी उत्सव श्रीराम मंदिर ध्यान मंदिर सांगोला येथे दिनांक १६ डिसेंबर ते दिनांक २५ डिसेंबर च्या दरम्यानक्ष साजरा केला गेला यानिमित्त दीक्षा भजन मौन गायन कीर्तन प्रवचन भजन रोज सकाळी सहा वाजता काकडा व सामुदाय जप राम मंदिर येथे संपन्न.

पंढरपूर येथील ह.भ.प. डॉक्टर जयवंत महाराज बोधले यांचे राम म्हणता रामाचे होईजेया विषयावर तीन दिवस स्वभावी अशी प्रवचन याला संपन्न झाली तसेच रायगड येथील सेवेकरी ह भ प. राघवेंद्र बुवा देशपांडे यांचे नारदीय कीर्तन झाले तर ह भ प. गुरुनाथ महाराज कोटणीस सांगली यांचे प्रवचन त्याचबरोबर यांचे दयानंद बनकर व त्यांचे सहकाऱ्यांचा भजन संध्या हा भागवत भक्ती गीते अभंग गवळणी सदाबहार कार्यक्रमाने संपन्न झाला. बुधवारी शुभांगी कवठेकर यांचे पुण्यतिथी चे किर्तन व श्रीराम महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली व श्रीमती कवठेकर यांना तबल्याची साथ श्रेया कुलकर्णी यांनी तर हार्मोनियम साथ शशिकांत लाटणे यांनी केली सूत्रसंचालन अश्विनी कुलकर्णी यांनी केले त्यानंतर महाराजांची पालखी व नगर प्रदक्षिणा शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली व दुसरी ध्यान मंदिरात आरती व महाप्रसाद होऊन उत्साहजी सांगता झाली.

## 'आंबेडकरी आई' ग्रंथाचे २८ डिसेंबरला प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई/प्रतिनिधी : भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेत दलित समाजातील अनेक महिलांनी आपल्या मुलींना उच्चशिक्षित केलेले आहे. अशा निवडक अज्ञात ,आदर्श ४२ मातांची समाजाला ओळख करून देणारा एक आगळा ग्रंथ ' आंबेडकरी आई ' येत्या शनिवारी २८ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईत प्रकाशित होणार आहे. संध्याकाळी ४ वाजता दादर ( पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात हा प्रकाशन समारंभ आंबेडकरी स्त्री संघटनेने आयोजित केला आहे. अर्थतज्ज्ञ, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील या समारंभात डॉ. सिसिलिया कार्व्हालो, प्रा. डॉ. अजित मकदुम, डॉ. प्रज्ञा दया पवार हे प्रमुख वक्ते आहेत. आंबेडकरी आई ' या ग्रंथाचे संपादन प्रा. आशालता कांबळे आणि डॉ. श्यामल गरुड यांनी केले आहे.

## नळदुर्ग ते अक्कलकोट एसटी बस च्या सर्व फेऱ्या पुर्ववत नियमित व वेळेवर सुरू ठेवण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर आगारातून सुटणाऱ्या व नळदुर्ग अक्कलकोट फेऱ्या मारणाऱ्या एसटी बस तुळजापूर आगारातून वेळेत व नियमित सोडून शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान टाळावे व अबालवृद्ध, महिला, ग्रामस्थ यांना होणारा आर्थिक आणि मानसिक त्रास ही कमी करावा असंही मागणी भाजपा मेडीया सेलचे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ सह ग्रामस्थ प्रवासी यानी लेखी निवेदना द्वारे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे तुळजापूर आगार प्रमुख यांच्या कडे केली आहे.

या बाबत आगार प्रमुखाना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की इ.१०वी,१२ वी , महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे दिवस जवळ येत आहेत.इ.१०वी व १२ वी चे वेळापत्रक आले आहे मात्र तुळजापूर अगाराच्या नळदुर्ग ते अक्कलकोट बस सेवेचे वेळापत्रक बिघडल्याने एसटी

**भाजपा मेडीया सेलच्या वतीने तुळजापूर आगार प्रमुखाना दिले निवेदन**

बस सेवा ही विस्कळीत झाल्याने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना,अबालवृद्ध प्रवासाना व महिलांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.वेळेत एसटी बस न आल्याने वीद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग ते वागदरी, येडोळा, गुजनूर, शहापूर,गुळहळ्ळी मार्गे अक्कलकोट ये जा करणाऱ्या तुळजापूर आगाराच्या एसटी बस या वेळेवर नियमित सोडून प्रवासान, विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी करावा तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी सकाळ संध्याकाळ सोडण्यात आलेल्या नळदुर्ग ते वागदरी,दहिटणा मार्गे गुळहळ्ळी बस कायमस्वरूपी नियमित सोडाव्यात अन्यथा या संदर्भात भाजपा सह ग्रामस्थांच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदना द्वारे देण्यात आला आहे. यावेळी रिपाइं (आठवले) चे जिल्हा समन्वयक तथा पत्रकार एस.के.गायकवाड, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड,सह कार्यकर्ते उपस्थित होते.

## मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक ढावन यांचा पोलीस अधीक्षकांनी प्रशस्त पत्रक देऊन केला सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा निवडणूक प्रक्रिया कुठलाही अनुचित प्रकार न करता शांततेत फार पाडल्या प्रकरणी मंगळाची पोलीस निरीक्षक महेश भावना यांना प्रशस्तीपत्रक देऊन सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी गौरव केला आहे.

महाराष्ट्रात दिनांक २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुका पार पडल्या यामध्ये पंढरपूर मंगळवेढा या मतदारसंघाचाही समावेश होता. मंगळवेढा तालुक्यातील बारा गावे संवेदनशील म्हणून पोलीस प्रशासनाने घोषित केली होती. मात्र येथेही शांततेत मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. साधा किरकोळ स्वरूपाचा गुन्हा गुन्ह्याची ही नोंद न झाल्याने पोलीस प्रशासनाची मान उंचावली असून याची पोलीस अधीक्षक कार्यालयाने दखल घेतली गेली. प्रत्येक वेळी निवडणुकीदरम्यान किरकोळ बाचाबाची चे प्रकार घडत असतात. यंदा मात्र असा कुठेही प्रकार घडल्याचे दिसून आली नाही मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात मतदान केंद्रावर बारकाईने लक्ष ठेवत शांततेत प्रक्रिया पोलीस निरीक्षक महेश भावना यांनी पार पडल्याबद्दल जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दखल घेऊन ढावण यांना




प्रशिक्षित पत्र देऊन नुकतेच त्यांना सोलापूर येथे गौरवण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक महेश सावंत यांना प्रशिक्षित पत्रक देऊन गौरवताना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी हे छायाचित्रात दिसत आहेत.

## शिरोली महागाव येथे महापुरुषांच्या पुर्णाकृती पुतळ्याचा अनावरण सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



बोंडगांव देवी/प्रतिनिधी : अर्जुनी मोरगाव तालुक्यातील साकेत बुद्ध विहार शिरोली/महागाव येथे दि.०१ जानेवारी २०२५ ला सकाळी ११ वाजता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या पूर्णाकृती मुर्त्यांचा अनावरण सोहळा संपन्न होणार असून या सोहळ्याचे उद्घाटन राजकुमार बडोले आमदार अर्जुनी मोर आणि यशवंत गणवीर उपाध्यक्ष जि.प.गोंदिया यांच्या हस्ते होणार आहे. पूर्णाकृती मुर्त्यांचा अनावरण सोहळ्याच्या अनुषंगाने तीन दिवस विविध प्रकारचे कार्यक्रम पार पडणार आहेत. ता.०१ जानेवारी २०२४ ला पूर्णाकृती मुर्त्यांचा अनावरण सोहळा व मार्गदर्शन सोहळा पार पडणार आहे.

या मार्गदर्शन सोहळ्याचे प्रमुख मार्गदर्शक, वक्ते प्रा.डॉ.आदे सर इतिहास विभाग प्रमुख गोविंदराव मुणघाटे विद्यालय कुरखेडा आणि प्रा.मुन्नाभाई नंदागवळी आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक गोंदिया हे आपल्या मार्गदर्शनातून विचार व्यक्त करणार आहेत. त्यानंतर ता.०२ जानेवारीला रात्रीला विविध सांस्कृतिक कार्यक्रम मुला मुलींसाठी ठेवण्यात आलेले आहेत त्यामध्ये सामाजिक प्रोत्साहन पर प्रथम बक्षीस १५०० रुपये, द्वितीय १०० रुपये, तृतीय ७०० रुपये, प्रोत्सांपर बक्षीस २०० रुपये प्रत्येक ग्रुपला देण्यात येणार आहे त्यानंतर ता.०३ जानेवारी ला सकाळी ११:०० वाजता व्याख्यान व बक्षीस वितरण ३:०० वाजता धम्म रॅली, ७:०० वाजता सामुहिक भोजनदान त्यानंतर रात्रीला भिमाचा वाघ म्हण रे संगीतमय धम्म प्रबोधन विकास राजा नागपूर हे करणार आहेत. ता.०१ जानेवारी २०२५ ला सकाळी ८:०० वाजता परित्राण पाठ बुद्ध वंदना व धम्मदेशना त्यानंतर ११:०० वाजता महामानवांच्या मूर्तीचा अनावरण सोहळा सत्कार समारंभ संपन्न होणार आहे. रामकृष्ण शेंडे मूर्ती दान दाते, प्रमोद मेश्राम मूर्ती दान दाते, राजकुमार बडोले नवनिर्वाचित आमदार अर्जुनी मोर यांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित उद्घाटक राजकुमार बडोले आमदार अर्जुनी मोरगाव, यशवंत गणवीर उपाध्यक्ष जि.प.गोंदिया, प्रमुख अतिथी म्हणून यशवंत सोनटक्के,दिनेश पंचभाई, दानेश साखरे नगरसेवक,अजय लांजेवार, सुगत चंद्रिकापुरे, डॉ.भारत लाडे,अतुल कडवे एस.व्ही.आय. कुही,सविता कोडापे सभापती पं.स.अर्जुनी मोर,होमराज पुसतोडे उपसभापती पं.स.अर्जुनी मोर,यशवंत परशुरामकर सभापती कृ.बा.स. अर्जुनी मोर, अनिल दहिवले उपसभापती कृ.उ.बा.समिती, पिंटू मंडल वैद्यकीय अधिकारी, भीमराव खोब्रागडे, राज रामटेके, जे.के. काळसर्पे प्राचार्य.बी. जी.पटले प्राचार्य, विजय कापगते,डी. आर. अवसारे ग्रा.अ.कविता कापगते सदस्य जि.प.गोंदिया, जयश्री देशमुख सदस्य जि.प.गोंदिया, पोर्णिमा ढेगे जि.प.गोंदिया,प्रमोद लांडगे सदस्य प.स.अर्जुनी, नाजूक लसूणते सरपंच शिरोली,सुधीर मेश्राम उपसरपंच,प्रभाकर कोवे सरपंच,मोहन साखरे सरपंच,सतीश कोसरे पो.पा.शिरोली,लोकेशन मेश्राम गोंदिया,एस.आर.रामटेके प्रा.स्वा, लायकराम भेडारकर , व्यंकट खोब्रागडे संचालक, उमाकांत ढेंगे, प्रकाश गहाणे, सोमेश्वर सोंदरकर,पिंटू आकरे,वर्षा घोरमोडे,एस.कुमार शहारे नगरसेवक,मंजुषा बारसागडे,प्रदीप मस्के,बालू नेवारे मोरगाव,संतोष रोकडे,सुरेंद्रकुमार ठवरे, छगन साखरे सदस्य महागाव यांच्या उपस्थित पार पडणार आहे.

## शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ माजी नगरसेविका डॉ.भारती सुबोध बावदाने व शिवसेना विधानसभा प्रमुख डॉ.सुबोध बावदाने आयोजित वेदांत हॉस्पिटल व ईशा नेत्रालय यांच्या वतीने निळकंठेश्वर मंदिर वर्षानगर आणि उपाध्यय सोसायटी वर्षानगर याठिकाणी मोफत रक्त तपासणी,आरोग्य तपासणी,नेत्र तपासणी व मोफत औषध उपचार तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये उपचाराधिन आढळलेल्या रुग्णांवर मोफत ह्दयरोग व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.या शिबिराचा विभागातील स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला.यावेळी





हे शिबिर यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी शिवसेना व महायुतीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कठोर परिश्रम घेतले. तसेच वेदांत हॉस्पिटल व ईशा नेत्रालय यांच्याही सर्व वरिष्ठ डॉक्टर व त्यांच्या टिमचे या शिबिराला मोलाचे सहकार्य लाभले असून आयोजक डॉ.भारती बावदाने व सुबोध बावदाने यांनी सर्व डॉक्टर व त्यांच्या टिमचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

## आज सर्वच क्षेत्रात मूली आघाडीवर आहेत भावी काळात हा देश मुलीच चालवतील : प्रा. दिलीप गरुड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनीधी : आज सर्वच क्षेत्रात मूली आघाडीवर आहेत भावी काळात हा देश मुलीच चालवतील असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.विद्यार्थ्यानी सकारात्मक राहून प्रसन्न व आनंदी चेहऱ्याने हसत समस्यांना सामोरे जावे व सातत्यपूर्ण परिश्रमातून यश मिळवावे असे आवाहन आदर्श महाविद्यालयाचे डॉ. दिलीप गरुड यांनी व्यक्त केले.

मायक्रोकॉम कॉम्प्युटर एज्युकेशन या संस्थेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

रोटरी क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. दिपक पोफळे, मायक्रोकॉमचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला, कौन बनेगा करोडपती फेम मुकुंद मोरे, संजय बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.




रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. दिपक पोफळे म्हणाले की, उच्च ध्येय बाळगून ध्येय प्राप्तीसाठी मेहनत, सातत्य, वेळेचे नियोजन, सकारात्मक विचार व दुरदृष्टी ठेवून मुल्ला सरांनी नोकरीच्या मागे न लागता उमरगा येथे सगणंक शिक्षणाची सोय करून हजारो विद्यार्थी घडविले, सोबतच या समाजाचे आपण काही देणे लागतो ही जाण ठेवून, स्वतःच्या यशात मशगूल न रहाता अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतला रोटरीच्या माध्यमातून त्यांनी वृक्ष लागवड, रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणीक मदत , करोना काळात शेकडो रुग्णांना अन्नदान अशा सामाजिक उपक्रमातून त्यांनी केलेलं कार्य उल्लेखनीय आहे. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून विद्यार्थ्यानी भावी आयुष्यात वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी यावेळीकेले.

कौन बनेगा करोडपतीच्या हॉटशिट पर्यंत जाऊन यश मिळविलेले जगदाळवाडी येथील शेतकरी मुकुंद मोरे व संजय बिराजदार यांची भाषणे झाली. यावेळी विविध स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. पुजा वाले, सुमय्या जमादार व रमेजा मोमीन यांचा संस्थेतील उत्कृष्ठ योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. मायक्रोकॉम संस्थेच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहीत्याचे वाटप करण्यात आले.

पुजा माने यांनी सुत्रसंचलन केले. तर सुमय्या जमादार यांनी आभार मानले. इरफान मुल्ला, माजीद बागवान, ओंकार इसराजी, अस्लम मुल्ला, रऊफ मुरशद यांनी यासाठी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### कोर्टाचा निकाल लागेपर्यंत शेतात यायचे नाही म्हणत मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : कोर्टाचा निकाल लागेपर्यंत शेतात यायचे नाही असे म्हणून शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २३ डिसेंबर रोजी सकाळी सव्वानऊ वाजण्याच्या दरम्यान कुमटे गाव येथे घडली. याप्रकरणी




नारायणसिंग मोहनसिंग रजपूत (वय-४६,रा.कुमठे गाव) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून नामदेवसिंग रजपूत,प्रकाश रजपूत,शारदाबाई रजपूत व हनुमान रजपूत (सर्व.रा.कुमठे गाव,सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी हे जुने सर्वे नंबर १६१ नवीन गट नंबर ३३६,३३७ कुमठा गाव सोलापूर येथे फिर्यादी यांचा चुलता नामदेवसिंग रजपूत याला चारा का कापून घेऊन जाता असे विचारले असता, वरील संशयित आरोपी याने फिर्यादीस तुम्ही कोर्टाचा निकाल लागेपर्यंत शेतात यायचे नाही असे म्हणून शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. तसेच प्रकाश रजपूत याने रॉडने फिर्यादी यांच्या डोळ्याच्या भुवईवर मारून जखमी केले.त्यानंतर शारदाबाई रजपूत आणि हनुमान रजपूत यांनीही शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल बहिर्जे हे करीत आहेत.

### यशोधरा हॉस्पिटल समोरून दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) यशोधरा हॉस्पिटल समोर पार्क करून ठेवलेली फिर्यादी दत्तात्रय नरसिंह माने (वय-२६-,रा.गुलंदवाडी,अनगर ता.मोहोळ) यांची दुचाकी क्रमांक एम.एच.१३.इजे.६१४९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ११ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी दत्तात्रय माने यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल उबाळे हे करीत आहेत.

# जलशक्ती अभियान : केंद्रीय पथकाने घेतला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : केंद्रपुरस्कृत 'जलशक्ती अभियान: कॅच द रेन' अंतर्गत विविध विभागाव्दारे करण्यात आलेल्या कामांचा आढावा आज केंद्रीय पथकाने घेतला. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेऊन सादरीकरणही करण्यात आले.

जलशक्ती अभियानः कॅच दी रेन या अभियानाचा आढावा केंद्रीय नोडल अधिकारी राकेश कुमार मीना, केंद्रीय अधिकारी श्रीमती एकता धवण या दोन सदस्यांच्या पथकाने जिल्ह्यातील विविध विभागाव्दारे जलशक्ती अभियानाअंतर्गत केलेल्या कामाचा आढावा घेतला.

या बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम ,जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा मृद व जलसंधारण दयासागर दामा, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा अधिकारी एम.जे. शेख जिल्हा जलसंधारण अधिकारी एस एस पारसे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारणचे श्री क्षीरसागर, जिल्हा सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.मोहन शेगर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता श्री.चौधरी, उपअभियंता व जनसंपर्क अधिकारी लाभ क्षेत्रचे श्रीमती व्हि.बी कोरे. भीमा विकास विभागाचे कार्यकारी अभियंता एस माने तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय पथकाने जिल्ह्यातील जलशक्ती अभियानातील कामांबाबत समाधान व्यक्त केले. जिल्ह्यातील कामगिरी चांगली असल्याचे सांगून त्यांनी जिल्ह्यात काही उपाययोजना राबविण्यावर भर द्यावा, अशी सुचना केली. त्यात प्रामुख्याने पावसाच्या पाण्याचे जलपुनर्भरण, जलपुनर्भरणाच्या विविध उपायांचा अवलंब करणे, रिचार्ज शाफ्ट सारख्या उपाययोजना आणखी वाढवणे, भुजल अधिनियमाचे काटेकोर पालन करणे. तसेच सोलापूर महानगरपालिका मार्फत नारी शक्ती से जलशक्ती अभियान व शिक्षण विभागातील शाळांनी जलशक्ती अभियानाची जागरूकता विषय कार्यक्रम घ्यावेत अशा सूचनाही यावेळी केल्या.

यावेळी ऑगस्ट २४ मध्ये झालेल्या जलशक्ती अभियानाच्या बैठकीतील सूचनांचा आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर जलसंचय जन भागीदारी चा आढावा घेण्यात आला .तसेच अमृत सरोवर योजनेच्या कामावर विशेष भर द्यावा अशा सूचनाही या बैठकीत करण्यात आल्या.

**जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा यांनी जिल्ह्यातील जलशक्ती अभियानांतर्गत नारीशक्ती ते जलशक्ती हे ब्रीद अंतर्गत जलसंधारणाची कामे, अमृत सरोवर योजना, रेन हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण रुंदीकरण बंधारे या कामांची माहिती दिली. तसेच भूजल सर्वेक्षण यंत्रणा अधिकारी श्री शेख यांनी या विभागामार्फत केलेल्या कामाचा आढावा दिल्यानंतर श्री राकेश कुमार मीना यांनी मागील बैठकीनंतर पाच महिन्यात हे काम समाधानकारक असून १.५ मीटर पाणी पातळी अवरेज वाढल्याचे समाधान व्यक्त केले.**




# कृष्णा महाराज ढोणे, आदमापूर यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



पंढरपूर : कृष्णा महाराज ढोणे, आदमापूर यांनी गुरवार दिनांक २६ डिसेंबर रोजी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे दर्शन घेतले. त्यावेळी त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांनी श्रींची मुर्ती व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. ढोणे महाराज हे प्रसिध्द भाकणूककार असून, श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत.

# ग्रामीण रूग्णालय वाशी येथे डायलिसीस रूग्णांना मोफत डायलिसीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/वाशी : सुधाकर रणदिवे, धाराशिव जिल्ह्यातील तालुका वाशी ग्रामीण रूग्णालय येथे रूग्णांना मोफत डायलिसीस ची सेवा देण्यात येत आहे. खेड्यातील व जवळच्या रूग्णांना याचा भरपूर फायदा होत आहे तसेच रूग्णांना योग्य त्या डायलिसीस च्या शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. आज पर्यंत ७१ डायलिसीस च्या शस्त्रक्रिया रूग्णांवर करण्यात आल्या आहेत. तसेच किडनी विकार तद्य डॉ दिनेश काञे ,डॉ शुभम ढाकणे ,डायलिसीस तंञ्य सुदर्शन रणदिवे , अलिशा मेश्राम कार्यरत आहेत व रूग्णांना योग्य उपचार मिळत आहेत.






# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात वीर बाल दिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. प्रारंभी वीर शिरीष कुमार मेहता यांच्या प्रतिमेस प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवृत्त पर्यवेक्षक शिवानंद पुजारी हे उपस्थित होते. हिन्दी विभाग प्रमुख मनीषा दूधभाते यांनी शिखांचे १० वे गुरु गोविंदसिंग यांचे सुपुत्र जोराहरसिंग व फत्तेहसिंग यांच्या बलिदानाच्या गौरवार्थ हा दिवस साजरा केला जातो. तसेच त्यांच्या वीरतेबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कु स्नेहा देडे सुप्रिया कोटी अक्षता साठे संस्कृती क्षीरसागर यांनीही वीर बाल दिनानिमित्त विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.

त्यानंतर इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांनी चित्रकला व निबंध लेखन स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला यात कुमारी शुभांगी पाटील, रोहिणी कोटी, दिव्या मोहिते, वैष्णवी टपाले, कृष्णा फुलारी सहभागी होते.

कुमारी अतुफा कारंजे, अफरीन शेख, अपेक्षा शिंदे या मुलींनी बालविरांच्या काही कविता सादर केल्या. यावेळी घेतलेल्या वादविवाद स्पर्धेत मलय्या हिरेमठ, समर्थ सुतार, पूजा बंदीछोडे, शुभांगी पाटील, कावेरी कोरे आदी विद्यार्थिनी भाग घेतले.

या कार्यक्रमासाठी कल्पना स्वामी, शरणबसप्पा चानकोटे,, सूर्यकांत रूगे, सिद्रामप्पा पाटील आदी शिक्षक उपस्थित होते.

# 'त्या' सुरक्षा रक्षकाचा मंदिर समिती सदस्याच्या हस्ते सत्कार व रोख बक्षीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : सुजित शेळवणे, मंडळाधिकारी टेंभुर्णी (ता.माढा) हे आपल्या कुटुंबासह रविवार दि.२२ डिसेंबर रोजी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आल्यानंतर संबंधित महिला भाविकाच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाळ झाले होते. सदर दागिने दर्शनरांगेतील रक्षक ग्रुपचे सुरक्षा रक्षक आदित्य बाबर, यास आढळून आले व त्यांनी तात्काळ नियंत्रण कक्षात दागिने जमा केले त्यानंतर खात्री करून संबंधित भाविकास ते परत करण्यात आले होते. सुरक्षा रक्षकाच्या प्रामाणिकपणा बद्दल मंदिर समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

आदित्य बाबर या सुरक्षा रक्षकाच्या प्रामाणिकपणाबद्दल मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर) यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मंदिर समितीच्या सदस्या ड. माधवी निगडे यांनी अभिनंदन करून १००० रुपये इतके रोख स्वरूपात बक्षिस दिले. सुरक्षा रक्षकाच्या प्रामाणिकपणा बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

याशिवाय, ड निगडे यांनी आज सकाळी मंदिर परिसराची पाहणी करून मंदिर परिसरातील अतिक्रमणाबाबत प्रशासनास सुचना करून, भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा करून देणेबाबत सुचित केले. त्यावर मंदिर सुरक्षा शाखा व नगरपरिषद पंढरपूर यांचेशी संपर्क करून सदरबाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसरात व मंदिराच्या भिंतीलगत मोठ्या प्रमाणात छोटे-मोठे व्यापारी यांनी अतिक्रमण केले होते. तसेच मोटारसायकली देखील लावण्यात येत असल्याने भाविकांना अडथळा निर्माण झाला होता. त्यावर प्रशासनाने मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमण दुर करून भाविकांचा मंदिर प्रदक्षिणा मार्ग सुलभ व जलद होण्यास मदत केल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.



# अविस्कार स्पर्धेमध्ये प्रा.पंढरी गोरे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा मिळाला कलर कोट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम ; गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय पुसद येथील पिएचडी सेंटर चे रिसर्च स्कॉलर प्रा. पंढरी गोरे ( श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिम ) यांनी यवतमाळ जिल्हास्तरीय प्रथम पुरस्काराने सन्मानानंतर विद्यापीठस्तरीय दिनांक २३ आणि २४ डिसेंबर या कालावधीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथील अविष्कार- २०२४ स्पर्धेमध्ये पोस्ट पीपजी प्रकारात मानवविद्या कला व भाषा या वर्गवारीत प्रथम पुरस्काराने सन्मानित झालेत. या सोबतच ते राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेत. राज्यस्तरावर ते अमरावती विद्यापीठाच्या अविस्कार टीमचे सहभागी म्हणून प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांनी सीएसआर आणि कृषी सक्षमिकरन या विषयावर आपले सादरीकरण केले. कृषी क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी सिएसआर फंड कशी महत्वाची भूमिका पार पाडू शकते हे त्यांनी आपल्या सादरीकरणातून मांडले. प्रथम क्रमांक (कलर कोड ) मिळाल्याबद्दल गुलाम नबी आझाद येथील समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य व अविस्कार स्पर्धेचे मार्गदर्शक डॉ. भालचंद्र देशमुख तथा संशोधन केंद्र प्रमुख डॉ राजेश काळे व पीचडी मार्गदर्शक डॉ. विवेक सिरस्कार यांनी अभिनंदन केले. गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच श्री.रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य तथा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



**२३ डिसेंबर ते ३ जानेवारीपर्यंत चालणार शोधमोहीम**

**उपजिल्हा रुग्णालय व क्षयरोग व तालुका आरोग्य कार्यालयाचा पुढाकार**

# कारंजा शहरात सक्रिय क्षयरुग्णांची आरोग्य कर्मचाऱ्याकडून घरोघरी जाऊन शोध मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कारंजा/प्रतिनिधी : कारंजा उपजिल्हा रुग्णालय व क्षयरोग व तालुका आरोग्य कार्यालय यांच्या वतने कारंजा शहरात सक्रिय क्षयरुग्ण व कुष्ठरोग रुग्णांची आरोग्य कर्मचाऱ्याकडून घरोघरी जाऊन (ऋउ) शोध मोहीम घेतली जात असून क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तीचे रोगनिदान व क्षयरोगावरील औषधोपचार मोफत आरोग्य उपचार यासाठी संशयित क्षयरुग्णाचे रोगनिदान दवाखान्यात करण्यात आहे. त्यामुळे गृहभेटी देऊन घरात असलेल्या सर्व व्यक्तींची क्षयरोग लक्षणांविषयी माहिती घेतली जात असून क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तीचा थुंकी नमुना गोळा करुन तपासणी करिता जवळच्या डी.एम.सी.ला पाठविणार येत असून यामध्ये क्षयरोग पर्यव्यक्षक राजेश चव्हाण,सिनियर ट्रॅटमेंट सुप्रवायझर निलेश पाटील, सिनियर ट्रॅटमेंट लॅबोटरी सुप्रवायझर रवी बर्गे , पर्यवेक्षक प्रतीक जाधव, पी.पी.एस.एय क्षेत्रकार्य आधिकारी प्रदिप पट्टेबहादुर, बहुउद्देशीय आरोग्य शुभम थोटांगे कर्मचारी, अविनाश वानखेडे,आशा सेविका शेकीला रायलिवळे,आशा से.सुनिता मस्के, आशा से.जुली रायलीवाले, आशा से.शकीला बाई ,आशा सेविका निकम मॅडम आरोग्य कर्मचारी,अशा सेविका ह्या कारंजा शहरातील घरोघरी जाऊन माहिती देत आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम हा राज्यामध्ये सर्व जिल्हे व महानगरपालिकांमध्ये केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वावर सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे प्रत्यक्ष क्षयरुग्ण शोध मोहीम ही २३ डीसेंबर २०२४ ते ०३ जानेवारी २०२५ कलावधी मधून राबविण्यात येतो.



या कार्यक्रमातंर्गत क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तीचे रोगनिदान व क्षयरोगावरील औषधोपचार मोफत उपलब्ध आहे. यासाठी संशयित क्षयरुग्णाचे रोगनिदान दवाखान्यात करण्यात येते. फुपफुसाचा क्षयरोग असणारे बरेचसे रुग्ण होणाऱ्या त्रासाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे व त्याबाबत डॉक्टरांकडे जाण्याचे टाळत असल्याचे आढळले आहे. वरील बस्तुस्थिती पाहता केंद्रशासनातर्फे अदयापही क्षयरोग निदानापासून वंचित असणाऱ्या अवरुग्णांना गृहभेटीव्दारे शोधून काढण्यासाठी सन २०२४ मध्ये क्षयरुग्ण शोध मोहीम राज्यामध्ये राबविण्याचे ठरविलेले आहे.

वाशिम जिल्हा आरोग्य विभाग व क्षयरोग विभागामार्फत या विशेष मोहिमेतंर्गत वाशिम जिल्हयातील बंचित घटक उदा. झोपडपट्टी, पोहचण्यासाठी अवघड गावे आणि वस्त्या, कारागृहातील कैदी, ज्या गावात रुग्ण जास्त असू शकतात असे गावे, एचआयव्ही अतिजोखीम गट, असंघटित कामगार, बांधकाम स्थळाच्या ठिकाणी काम करणारे कामगार, बेघर, वृध्दाश्रम अशा निवडलेल्या भागांमध्ये सक्रियपणे

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोबरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.रेश्मा पाटील,वैद्यकीय अधिकारी डॉ.सतीश परभनकर ,पी पी.एस.एय, जिल्हा समन्वयक डीगांबर महाजन, कारंजा तालुका आरोग्य अधिकारी डॉ . शंकर नांदे आणि वैद्यकीय अधिक्षक डॉ.साळुंखे साहेब यांचा मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था व नेहरू युवा बहुउद्देश्य मंडळ केकतउमरा व सर्वधर्म समभाव मित्र मंडळ यांचे प्रतिनिधी यांचे विशेष सहकार्य मिळत आहे.

**क्षयरोगाची खालील प्रमाणे लक्षणे असतात. दोन आठवडयापेक्षा जास्त कालावधीचा खोकला असणे तसेच दोन आठवडयापेक्षा मुदतीचा ताप असणे मागील तीन महिन्यामध्ये वजनात लक्षणीय घट असणे मागील सहा महिन्याच्या कालावधीत कधीही थुंकीवाटे रक्त पडत असणे मागील एक महिन्यापासून छातीत दुखणे, यापूर्वी क्षयरोगाचे उपचार घेतलेले असणे वरिलपैकि कोणतेही लक्षणे असल्यास सदर व्यक्तीने तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.**

## थोडक्यात...

### शासकीय कामात अडथळा करून मारहाण ; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) शासकीय कामात अडथळा निर्माण करून शिवीगाळ करत मारहाण करून दुखापत केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २५ डिसेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अंबिका नगर येथे घडली.याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल वसेकर नेमणूक एमआयडीसी पोलीस ठाणे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शोएब महबूब इनामदार व समीर महबूब इनामदार (दोघे.रा.अंबिका नगर,नई जिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची थोडक्यात हाकिकत अशी की,फिर्यादी शासकीय कर्तव्य बजावत असताना वरील संशयित आरोपी यांनी गायी कापण्यासाठी घेऊन आले आहेत. अशी माहिती फिर्यादी यांना मिळाल्यानंतर त्यांनी चौकशी करिता गेले होते.त्यावेळी वरील ठिकाणी संशयित आरोपी यांनी त्यांच्यासोबत असलेला नदीम नावाचा इसम याने फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी शिवीगाळ करून अंगावर धावून येऊन हाताने मारहाण करून दुखापत केली आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोसई.गाढवे हे करीत आहेत.

### पवन ऊर्जा प्रकल्प : शेतकऱ्यांनी अडचणीसंदर्भात संनियंत्रण; समितीकडे अर्ज करण्याचे आवाहन

धाराशिव : राज्य शासनाच्या उदयोग,ऊर्जा व कामगार विभागाच्या ३१ ऑक्टोंबर २०१३ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पवन ऊर्जा प्रकल्प उभारणीस चालना देण्यासाठी तसेच शासनाचे विविध विभाग,जमीन मालक / शेतकरी व प्रकल्प विकास / प्रकल्पधारक यांच्यामध्ये समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पवन ऊर्जा प्रकल्प-जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती आणि महसूल उपविभाग स्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पवन ऊर्जा प्रकल्प उपविभाग स्तरीय समन्वय समिती स्थापन केली आहे.शेतकऱ्यांचे पवन ऊर्जा प्रकल्पासंदर्भातील असणारे विविध प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली २७ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथील सभागृहात आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे असून पवन ऊर्जा प्रकल्पांशी निगडीत असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनियमितता तपासणे,पवन ऊर्जा प्रकल्पांशी निगडित असलेल्या जमीन व्यवहारांमध्ये योग्य व व्यावहारिक मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे,पवन ऊर्जा प्रकल्पांबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करुन त्यावर योग्य ती कार्यवाही करणे, जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उदभवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे अशी आहे. पवन ऊर्जा प्रकल्प - जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची धाराशिव जिल्हयातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने ज्या शेतकऱ्यांच्या अडचणी आहेत,त्या शेतकऱ्यांनी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# यात्रा कालावधीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही : आ. आवताडे

## कासेगावात यल्लमा देवी यात्रेनिमित्त जय्यत तयारी; यात्रा उत्सवाच्या पूर्वसंध्येला आ. आवताडे यांनी घेतली आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कासेगाव( ता. पंढरपूर) येथील श्री यल्लामा देवीच्या यात्रेसाठी महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, पंजाब व आंध्र प्रदेश या राज्यातून लाखो भाविक भक्त येत असतात. या यात्रेसाठी प्रशासनाकडून विशेष तयारी सुरू असून काल पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे सदस्य आमदार समाधान आवताडे यांनी यात्रेतील तयारीचा आढावा घेत अधिकाऱ्यांना सूचना केल्या. भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून आमदार समाधान आवताडे यांनी गुरुवारी श्री यल्लमा देवीच्या मंदिर परिसर व विविध ठिकाणी भेट देऊन त्या त्या ठिकाणाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.यात्रा काळात कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये तसेच भाविकांची लूटमार होणार नाही याकडे लक्ष द्यावे अशा सूचना त्यांनी पोलीस प्रशासनास केल्या.




तसेच महावितरण अधिकारी यांनीही यात्रा काळात वीज पुरवठा खंडित होऊ नये याची काळजी घेण्याचा सूचना त्यांनी केल्या. सोबतच आरोग्य विभागातील अधिकारी यांची ही बैठक घेत त्यांनी यात्रा काळात कोणत्या भविकास काही त्रास झाल्यास अतिदक्षतेसाठी वैद्यकीय टीम तसेच रुग्णवाहिका राखीव ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिला. सोबतच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनाही ज्यादा बसेस सोडण्यात याव्या व भाविकांची गैरसोय होणार नाही याकडे लक्ष द्यावे. तसेच यात्रेतील भाविक भक्तांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये व स्वच्छतेसाठी दक्षता घ्यावी अशी सूचनाही पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत. यावेळी पंढरपूर तहसीलचे तहसीलदार सचिन लंगोटे पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशील संसारे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मेटकरी साहेब व महावितरण विज कंपनीचे अधिकारी तसेच राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी आणि प्रशासनातील सर्व अधिकारी उपस्थित होते यावेळी कासेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच शोभा भोसले उपसरपंच संग्राम सिंह देशमुख पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांत भैया देशमुख तसेच भाजपा जिल्हा अध्यक्ष विजयसिंह दादा देशमुख अनिकेत देशमुख हनुमंत ताटे भीमा आबा भुसे नौशाद भाई शेख भास्कर घायाळ प्रकाश रुपनर केतन देशमुख सज्जन जाधव चंदू जाधव तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्राम विकास अधिकारी आर पी कोळी महसूल चे मंडलाधिकारी पंकज राठोड व तलाठी भाऊसाहेब अनिल बागल उपस्थित होते.

# मतदारसंघात येत असलेल्या चिखली तालुक्यातील २२ गावासाठी निधी कमी पडू देणार नाही

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

कैलास आंधळे /चिखली तालुका प्रतिनिधी

सिंदखेडराजा मतदारसंघातील चिखली तालुक्यातील २२ गावांतील शेतकऱ्यांना जीवनवाहिनी बनविणाऱ्या खडकपूर्णा धरणाच्या उपसा सिंचन टप्पा क्रमांक एक ते चारच्या पाण्याचे जल-पूजन बुलढाणा जिल्हा जलक्रांतीचे प्रणेते माजी मंत्री भारतभाऊ बोंद्रे व सिंदखेडराजा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज कायदे यांच्याहस्ते दिनांक २६ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता रामनगर येथे पार पडले.शेवटच्या टोकावरील या गावांत विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही.

तसेच, ज्या भागात काही अडचणींमुळे पाणी पोहोचले नाही, त्या अडचणी दूर करून पाणी पोहोचवू व त्यासाठी लवकरच बैठक लावू,अशी ग्वाहीही याप्रसंगी आ. कायंदे यांनी दिली.याप्रसंगी उपस्थितांमध्ये बुलढाणा जिल्हा जलक्रांतीचे शिल्पकार माजी मंत्री भारतभाऊ बोंद्रे, चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेताताई महाले यांचे वडील अंकुशराव पडघान, इरफान अली प्रदेश सरचिटणीस,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष अँड.नाझेर काझी,उपाध्यक्ष मनोज दांडगे,भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा शेतकरी नेते शेणफडराव घुबे,राष्ट्रवादी जिल्हा कार्याध्यक्ष शंतनू बोंद्रे, परिसरातील गावांतील पाणी वापर संस्थाचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी,पाटबंधारे विभागाचे अभियंता व कर्मचारी व शेतकरीवर्ग उपस्थित होता.



### आमदार मनोज कायंदे यांची रामनगर येथील जलपूजन कार्यक्रमातून ग्वाही

या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन रामनगर येथील राजेंद्र भगत व ग्रामस्थांनी करून उपस्थितांची भोजनाची व्यवस्थादेखील केली होती.

# अंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयास घवघवीत यश मिळाले. ही कुस्ती स्पर्धा के. एन. भिसे. महाविद्यालय,मोडनिंब येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत २९ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे नऊ खेळाडूं विद्यार्थी सहभागी झाले होते. यामधील खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.







कु. दिव्यसाक्षी धोत्रे या खेळाडूने ५४ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. ७६ किलो वजनी गटात कु. चंद्रिका बाबर बीएस्सी भाग दोन हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याचबरोबर जयदीप पवार ५६ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

या सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, डॉ. तुकाराम अनंतकवळस डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. अनिल चोपडे, डॉ. उमेश साळुंखे व महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, जिमखाना विभाग सदस्य,शिक्षक कर्मचारी यांनी केले. तसेच या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, विठ्ठल फुले, आणि मनोज खपाले यांचे मार्गदर्शन लाभले.

# मुलीना प्रेरित करण्यासाठी शिक्षक राजेंद्र पवार स्वखर्चाने क्रीडा कपडे उपलब्ध करून दिल्याने सर्वत्र कौतुक

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : त्या शाळेचे शिक्षक राजेंद्र पवार यांनी तालुका क्रीडा स्पर्धेत लंगडी मध्ये प्रथम क्रमांक पटकावून जिल्हासतरासाठी निवड झालेल्या तोळणूंर प्राथमिक कन्नड शाळेतील लहान व मोठा गटातील मुलींना व मोठा गटातील बुद्धिबळ मध्ये प्रथम क्रमांक पत्काविलेल्या अनन्या सतलगावची सहित २४ मुलीना .प्रोत्साहन देण्यासाठी स्वखर्चाने क्रीडा कपडे देऊन प्रोत्साहन दिले.



सीमावराती भागातील कन्नड शाळा वाचवण्यासाठी शिक्षकांची धडपड करीत असतात . तोळणूंर येथील विद्यार्थीप्रेमी शिक्षक राजेंद्र पवार यांनी तालुका क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी बाजी मारल्यास स्वखर्चाने सर्व मुलींना खेळाचे कपडे देऊन गौरव करू असे शब्द दिले होते. पवार सरांचे प्रेरणा घेवून प्रेरीत झालेल्या मुलींनी लंगडी व बुद्धिबळात तालुकास्तरावर सलग तिसऱ्यांदा यश संपादन करून सर्वांची वाहवा मिळवली.

शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने विजेत्या मुलींची शिक्षकांनी गावात डीजे वाजवून जल्लोशात मिरवणूक काढली. आपले मुलांचे कौतुक बघून पालकांनि खूप आनंद व्यक्त करून शिक्षक राजेंद्र पवार सरांचे आभार मानले. तोळणूंर शाळेला तालुक्यातील अस्सल कन्नड शाळा म्हणून ओळखली जाते. . त्यामुळेच येथील मुलांची पटसंख्या जास्त आहे, २९८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि ११ शिक्षक कार्यरत आहेत. सीमाभागातील शिक्षकांनी आपल्या शाळेचा पटसंख्या वाढवण्यासाठी काही योजना आखताना कन्नड भाषेची बचत आणि विकास करण्यात स्वतःला गुंतवले आहे. शिक्षक राजेंद्र पवार यांनी केलेल्या या कार्याचे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

शाळेचे मुख्याध्यापक पंचप्पा शिवमूर्ती, क्रीडा शिक्षक गुंडप्पा पोतदार, राजशेखर पाटील, अण्णाराव होराकेरी, परमेश्वर चौधरी, शिवराय रत्नाकर, भीमाशंकर नमातुरे, सुखदेव कोळी, सिद्धराम भैरामडगी, अनिल राठोड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रियांका मुगळीमठ, उपाध्यक्ष्या अश्वीविनी केरूर सदस्य साहिती ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केले.

# कलदेव लिंबाळा येथे श्री संत काशिबा महाराज गुरव यांची पुण्यतिथी साजरी



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील कलदेव निंबाळा गावामध्ये थोर समाज सुधारक व गुरव समाजाचे आराध्य दैवत प.पू .श्री. संत काशीबा महाराज गुरव यांची पुण्य तिथी गावातील मुख्य चौकात प्रतिमा पूजन करून मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून साजरी करण्यात आली.

या प्रसंगी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष कलाकार पाटील, ग्रामविकास अधिकारी विजयानंद डोणगावे, सुनिल बलसुरे, गुंडू मामा ढोणे, शैलेश पाटील, बालाजी कुलकर्णी, तुकाराम डोणगावे सागर कुलकर्णी, संजय घोटमाळे, शिवाजी बोकडे,बालाजी कुलकर्णी, शैलेश पाटील,सुनील बलसुरे,गजानन डोनगावे बालाजी पाटील, शंकर कुलकर्णी सागर कुलकर्णी, तुकाराम डोनगावे यांच्यासह गुरव समाज बांधव व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## रिपाइं (आठवले) सह ग्रामस्थांनी केली मागणी

## विविध मागण्यांचे दिले निवेदन

# नळदुर्ग ते अक्कलकोट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५२ चे प्रलंबित काम त्वरित पूर्ण करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/ एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग ते वागदरी,येडोळा,गुजनूर, शहापूर,गुळहळ्ळी मार्गे अक्कलकोट जाणारा नव्याने मंजूर झालेला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५२ चे सिमेंट रोडचे काम गेल्या सहा वर्षांपासून जागोजागी प्रलंबित आहे.ते प्रलंबीत काम त्वरित

पूर्ण करून या मार्गावरील वाहतूक सुरळीत करावी या मागणीचे लेखी निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे धाराशिव जिल्हा समन्वयक तथा जिल्हा सचिव एस.के.गायकवाड सह ग्रामस्थांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना तुळजापूर येथे आयोजित आम सभेत जणता दरबार प्रसंगी दिले.

विधानसभा-२०२४ निवडणुकी नंतर तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या माध्यमातून विजयी झालेले भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दि.२४ डिसेंबर २०२४ रोजी विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी तुळजापूर येथील शासकीय विश्रामगृहात पहिल्यांदाच आमसभेचे आयोजन केले होते.या प्रसंगी रिपाइं (आठवले) चे जिल्हा समन्वयक तथा पत्रकार एस.के. गायकवाड , यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील उर्फ राणा दादा यांना सदर मागणीचे निवेदन दिले असून त्यात म्हटले आहे की, नळदुर्ग ते अक्कलकोट या राष्ट्रीय महामार्गचे काम शेतकरी,शासन, प्रशासन, गुत्तेदार व न्यायालय यांच्या चक्रव्यूहात आडकले असून गेल्या सहा वर्षांपासून जागोजागी शेतकऱ्यांनी आडविल्याने अर्धवट अवस्थेत रखडले आहे.ज्याठिकाणी काम रखडले आहे त्या ठिकाणी रोडवर मोठमोठे खड्डे पडले असून दगडही उघडे पडले आहेत.



त्यामुळे या रस्त्यावरून वहान चालवणे मोठे जोखमीचे झाले असून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. वारंवार या बाबत जनतेनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन विधानसभा निवडणुक-२०२४ च्या प्रचारार्थ नळदुर्ग येथे आयोजित प्रचार सभेत देशाचे केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नामदार नितीन गडकरी यांनी या रोडचे प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी ६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून लवकरच हे काम पूर्ण करण्यात येईल असे सांगितले होते.परंतू अद्याप या कामाला सुरुवात झाली नाही. तरी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी या कामी योग्य तो पाठ पुरावा करून या रोडचे प्रलंबित काम त्वरित पूर्ण करून या रोडवरील वहातूकव्यवस्थ सुरळीत करावी असी मागणी केली आहे.या प्रसंगी भाजपा मेडियासेलचे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ, सरपंच फुलचंद वाघमारे, लहुजी शक्ती सेनेचे महादेव मोरे सह वागदरी, येडोळा,गुजनूर, शहापूर, गुळहळ्ळी,दहीटणा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.